पहिले राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलन 2026
परिवर्तनाचा विचार, साहित्याची शक्ती, समाजाचा विकास !

दैनिक
# निळे प्रतिक



(संपादक)
**रतनकुमार साळवे**
MA (Mass Communication and Journalism)
MA (Pali and Buddhism)
MA (Phule-Ambedkar Thought)
Mo. 9923502320

● छत्रपती संभाजीनगर ● वर्ष : २ रे ● अंक : ३५२ ● शुक्रवार दि.२ ऑक्टोबर २०२६ ● किंमत ५.०० रू ● पाने : ०४ ● nilepratik02@gmail.com ● दैनिक

# २ ऑक्टोबरच्या 'जेल भरो' आंदोलनाला पवारांचा थेट पाठिंबा

## अभिजीत दीपके अन् ठाकरे बंधूंच्या मोर्चांना राष्ट्रवादीची साथ

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**मुंबई (वृत्तसंस्था)**

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या वादग्रस्त कारभाराविरोधात, मतदार याद्यांमधील कथित 'एसआयआर' (डखठ) घोटाळ्यावरून मुंबईत पुकारण्यात आलेल्या आंदोलनांना आता महाविकास आघाडीतील बड्या राजकीय पक्षांचे मोठे बळ मिळताना दिसत आहे. कॉकरोच जनता पार्टीचे (उगझ) प्रमुख अभिजीत दीपके यांनी उद्या, २ ऑक्टोबर (गांधी जयंती) रोजी दादरच्या शिवाजी पार्क परिसरात पुकारलेल्या राज्यव्यापी 'जेल भरो' आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने अधिकृत व जाहीर पाठिंबा दिला आहे. पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ही महत्त्वपूर्ण घोषणा केली.या घोषणेमुळे उद्याच्या आंदोलनापूर्वी अभिजीत दीपके आणि त्यांच्या युवा समर्थकांचे राजकीय वजन लक्षणीयरीत्या वाढले आहे. केवळ २ ऑक्टोबरच्याच नव्हे, तर ४ ऑक्टोबर रोजी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या संयुक्त पुढाकाराने मुंबईत निघणाऱ्या विराट महामोर्चालाही शरद पवार यांच्या पक्षाचा पूर्ण पाठिंबा असल्याचे सुप्रिया सुळे यांनी यावेळी जाहीर केले.

नवी दिल्लीतील 'इंडिया' आघाडीच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांशी बोलताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मनमानी कारभाराविरोधात आणि देशातील लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी उद्या २ ऑक्टोबर रोजी अभिजीत दीपके यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत 'जेल भरो' आंदोलन होत आहे. या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा पूर्ण पाठिंबा आहे. तसेच, येत्या ४ ऑक्टोबरला ठाकरे बंधूंच्या (राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे) नेतृत्वाखाली मुंबईत जो भव्य मोर्चा निघणार आहे, त्या मोर्चालाही आमचा पाठिंबा असेल.दरम्यान, दोन्ही आंदोलनांना पक्षाचा नैतिक व राजकीय पाठिंबा असला, तरी शरद पवार किंवा पक्षाचे ज्येष्ठ नेते स्वतः या आंदोलनांच्या मंचावर प्रत्यक्ष सहभागी होणार का, याबाबतची अधिकृत रणनीती अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आली आहे.



निवडणूक आयोगाच्या भूमिकेविरोधात विरोधकांनी एकामागोमाग एक आंदोलनांची मालिका उभी केली आहे. 'शिवतीर्थ'वरील संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले होते की, २ ऑक्टोबरच्या आंदोलनाला त्यांचा पूर्ण पाठिंबा आहे. यापूर्वी जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनालाही शिवसेनेने पाठिंबा दिला होता. तर राज ठाकरे यांनीही, हा स्पर्धेचा विषय नसून लोकशाहीसाठी जो कोणी रस्त्यावर उतरेल, त्याला आमचा पाठिंबा राहील, असे स्पष्ट केले होते.काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी आधीच जाहीर केले आहे की, मुख्य निवडणूक आयुक्तांच्या मनमानी कारभाराविरोधात काँग्रेस रस्त्यावर उतरणार असून, ४ ऑक्टोबरच्या ठाकरे बंधूंच्या महामोर्चातही काँग्रेसचे नेते-कार्यकर्ते सक्रिय सहभागी होतील. आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीनेही पाठिंबा दिल्याने विरोधकांची भक्कम एकजूट स्पष्ट झाली आहे.अभिजीत दीपके यांनी पुकारलेल्या या 'जेल भरो' आंदोलनात राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर 'जेन-झी' (ऋशप-न) म्हणजेच तरुण मतदार आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी सहभागी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दादरचा शिवाजी पार्क परिसर 'सायलेंट झोन' असल्याने आणि स्थानिकांकडून तसेच काही संघटनांकडून आंदोलनाला विरोध होत असल्याने मुंबई पोलिसांवर मोठा ताण आला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी दादर आणि शिवाजी पार्क परिसरात पोलिसांचा प्रचंड फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.एकीकडे विरोधक निवडणूक आयोगाविरोधात एकत्र येत असतानाच, दुसरीकडे महायुतीमध्येही रात्री उशिरा महत्त्वपूर्ण राजकीय घडामोडी घडल्या आहेत. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांमध्ये रात्री उशिरा वर्षा बंगल्यावर महत्त्वाची बैठक पार पडली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विधान परिषदेच्या आगामी पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकांना भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) हे तिन्ही पक्ष 'महायुती' म्हणून एकजुटीने सामोरे जाणार असून, जागावाटपावर तिन्ही प्रमुख नेत्यांचे एकमत झाल्याचे समजते. उद्याच्या २ ऑक्टोबरच्या अभिजीत दिपकेंच्या 'जेल भरो' आंदोलनाकडे आणि त्यानंतर ४ ऑक्टोबरला भायखळा ते महापालिका मुख्यालयादरम्यान निघणाऱ्या ठाकरे बंधूंच्या महामोर्चाकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# विद्युत तारा स्पर्शाने उभा ऊस जळून खाक

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**परभणी । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे ठोळा शिवारात शेतातून गेलेल्या विद्युत तारा एकमेकांना भिडल्याने उडालेल्या ठिणग्यांमुळे भीषण आग लागली. या दुर्घटनेत शेतकरी रामदास देविदास खोंड आणि लक्ष्मण देविदास खोंड या दोन्ही भावांचा सुमारे ४ ते ५ एकरांतील तोडणीस आलेला ऊस पूर्णपणे जळून खाक झाला.

ही घटना आज, गुरुवार, दिनांक १ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ च्या सुमारास घडली. पाण्याअभावी शेतकरी दुष्काळाच्या झळा सोसत



असताना चिंतातूर आहे. हाताला आलेले उसाचे पीक जळून खाक झाल्याने खोंड परिवाराचा तोंडचा घास हिरावला आहे. प्रशासनाने पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे.

# जालना जिल्ह्यात चारा वाहतुक व विक्रीस बंदी

## हिरवा चारा, कडबा, कुट्टी, पेंढा, टीएमआरसह पशुखाद्याच्या वाहतुकीवर निर्बंध, जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांत 'ट्रिगर-१' (प्रथम टप्पा) दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात उपलब्ध असलेला चारा बाहेर जाण्यापासून रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जालना जिल्ह्याच्या हद्दीतून अन्य जिल्ह्यात किंवा राज्याबाहेर कोणत्याही प्रकारचा सुका अथवा ओला चारा वाहतूक करून नेण्यास तसेच विक्री करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (BNSS) मधील कलम १६३ अन्वये याबाबत आदेश काढला आहे. हा आदेश ३० सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजल्यापासून पुढील आदेश होईपर्यंत लागू राहणार आहे.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करता स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेला चारा मोठ्या प्रमाणावर इतर जिल्ह्यांत किंवा सीमावर्ती भागात विक्रीसाठी पाठविला जाऊ शकतो. त्यामुळे जालना जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कमी होऊन चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. या परिस्थितीत पशुधनाच्या जीविताला धोका निर्माण होण्याबरोबरच त्यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे चाऱ्याची वाहतूक रोखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या आदेशानुसार हिरवा चारा, कडबा, कोणत्याही प्रकारची कुट्टी, पेंढा, टीएमआर व इतर प्रकारचे पशुखाद्य जिल्ह्याबाहेर नेता येणार नाही. या वस्तूंची जालना जिल्ह्याच्या हद्दीतून अन्य जिल्ह्यात किंवा राज्याबाहेर वाहतूक करण्यास आणि विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. शासकीय योजना, पशुसंवर्धन विभाग किंवा जिल्हा प्रशासनाने अधिकृत मंजुरी दिलेल्या चारा वाहतुकीला मात्र हा आदेश लागू राहणार नाही. संबंधित विभागाची अधिकृत परवानगी असल्यास अशा वाहतुकीस नियमांनुसार मुभा राहणार आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम २२३ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातून चारा बाहेर नेताना संबंधितांनी प्रशासनाच्या आदेशाचे पालन करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या शासन निर्णयानुसार जालना जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांत ट्रिगर-१ (प्रथम टप्पा) दुष्काळ घोषित करण्यात आला आहे.

# विचारांच्या संघर्षकाळात परिवर्तनवादी साहित्य संमेलनाची गरज-भीमराव सरवदे

## संमेलन राज्यभर दखल घेणारे ठरेल, समितीचा ठाम विश्वास, सहावी नियोजन बैठक संपन्न

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

सध्याच्या प्रतिकूल वैचारिक वातावरणात परिवर्तनवादी आणि आंबेडकरी विचारांची भूमिका अधिक ठामपणे मांडण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत पहिले राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलन रविवार १८ ऑक्टोबर रोजी तापडिया नाट्यमंदीर संभाजीगर येथे संपन्न होत असून, हे संमेलन निश्चितच ऐतिहासिक ठरेल, असा विश्वास ज्येष्ठ साहित्यिक भीमराव सरवदे यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, रतनकुमार साळवे यांनी परिवर्तनवादी साहित्य संमेलनाची संकल्पना मांडून त्याची सुरुवात केली असून, त्यांच्या या उपक्रमामुळे साहित्यिक, सामाजिक आणि परिवर्तनवादी चळवळीतील लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. त्यांनी स्वीकारलेली जबाबदारी महत्त्वाची आहे. देशभरातील सद्य वैचारिक वातावरणात आंबेडकरी विचारांसमोर विविध आव्हाने उभी आहेत.



अशा परिस्थितीत परिवर्तनवादी विचारांचा जागर करण्यासाठी साहित्य, संस्कृती आणि सामाजिक परिवर्तनाच्या भूमिकेला बळ देणारे विचारपीठ उभे राहणे आवश्यक आहे. त्यामुळे हे संमेलन केवळ साहित्यिक कार्यक्रम न राहता परिवर्तनवादी विचारांच्या प्रसाराचे महत्त्वपूर्ण माध्यम ठरावे, यासाठी सर्वांनी शेवटपर्यंत एकजुटीने काम करणे गरजेचे आहे. पहिले राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलनाच्या सहाव्या नियोजन बैठकीत ते बोलत होते. ही बैठक गुरुवारी सुभेदारी गेस्ट हाऊस, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाली. प्रारंभी संमेलनाचे मुख्य संयोजक रतनकुमार साळवे यांनी संमेलनाची संकल्पना, आतापर्यंत झालेले नियोजन, विविध समित्यांच्या माध्यमातून सुरू असलेले काम तसेच आगामी नियोजनाची सविस्तर माहिती उपस्थितांसमोर मांडली. यावेळी डॉ धनराज गोंडाणे यांनी देखील आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, संमेलन यशस्वी करणे ही आपली जबाबदारी आहे. आपण तण, मन,धनाने, हे संमेलन यशस्वी करू. आणी अत्यंत दर्जेदार आणि देखणा हा सोहळा होईल, हा माझा विश्वास आहे. संमेलनाच्या नियोजनासंदर्भात उपस्थितांनी विविध सूचना मांडल्या. या सूचनांवर समितीच्या वतीने सविस्तर चर्चा करण्यात आली. संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी आगामी काळातील विविध जबाबदाऱ्या आणि नियोजन बाबतही चर्चा झाली.बैठकीला रतनकुमार साळवे, डॉ. धनराज गोंडाणे , उज्वलकुमार म्हस्के, रतनभाई खंडागळे, महादेव डांबरे, विठ्ठल सपकाळ, कांचन सदाशिवे, धम्मप्रिया खरात, मुकुंद सुरडकर, सुषमा गायकवाड, संजय वानखेडे, डॉ. मधुकर दिवेकर, विनोद मोरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन उज्वलकुमार म्हस्के यांनी केले, तर आभार कांचन सदाशिवे यांनी मानले.

# संपादकीय

## दुष्काळ शेतकऱ्यांच्या जगण्याचा प्रश्न

महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा केंद्रबिंदू शेती आहे. शेतकऱ्याच्या शेतात पीक उभे राहिले तर गावातील बाजारपेठेला चालना मिळते, शेतमजुरांच्या हाताला काम मिळते आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चक्र गतिमान होते. मात्र पावसाने साथ सोडली की त्याचा परिणाम केवळ एका शेतकऱ्याच्या शेतापुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण गावाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे परिणाम जाणवू लागतात. त्यामुळे दुष्काळ हा केवळ पाण्याचा प्रश्न नसून शेतकरी, शेतमजूर, पशुधन, रोजगार, बाजारपेठ आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे.यंदाच्या हंगामात अनेक भागांत पावसाचे असमान वितरण, पावसातील खंड आणि पिकांच्या गरजेच्या काळात अपेक्षित पाऊस न मिळाल्याने शेतकऱ्यांसमोर पुन्हा संकट उभे राहिले आहे. कुठे पेरणी झाली, पिके उगवली; मात्र पुढील वाढीसाठी आवश्यक ओलावा उपलब्ध झाला नाही. काही ठिकाणी पिके करपण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या नजरा पुन्हा आभाळाकडे लागल्या आहेत. पेरणीपासून मशागतीपर्यंत शेतकऱ्याने केलेला खर्च, घेतलेले कर्ज आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी ठेवलेल्या अपेक्षा या सर्वांचा आधार पिकाच्या उत्पादनावर असतो. मात्र पाऊसच दगा देत असेल तर शेतकऱ्याच्या आर्थिक गणिताचा पाया डळमळतो.शेतकऱ्याला बियाणे, खत, औषधे, मजुरी, मशागत, डिझेल यासाठी मोठा खर्च करावा लागतो. अनेक वेळा हा खर्च भागविण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. पीक चांगले आले तर कर्ज फेडण्याची आणि पुढील हंगामाची तयारी करण्याची आशा असते. परंतु पावसाअभावी उत्पादन घटले तर उत्पन्न कमी होते आणि कर्जाचा भार वाढतो. त्यामुळे दुष्काळाचे संकट एका हंगामापुरते मर्यादित राहत नाही; त्याचा परिणाम पुढील अनेक हंगामांवर होतो. या परिस्थितीत शेतकऱ्याला केवळ सहानुभूतीची नव्हे, तर ठोस आर्थिक आणि प्रशासकीय आधाराची गरज आहे.दुष्काळाचा फटका केवळ पिकांना बसत नाही, तर पशुधनावरही त्याचे गंभीर परिणाम होतात. शेतात चारा उपलब्ध राहत नाही, पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते आणि जनावरे सांभाळणे शेतकऱ्यांसाठी कठीण बनते. पशुधन हा ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा आधार असल्याने जनावरे विकण्याची वेळ शेतकऱ्यावर येऊ नये, यासाठी प्रशासनाने चारा आणि पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर दुष्काळी भागातील भूमिहीन शेतमजूर कुटुंबांचाही गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. शेतीत काम उपलब्ध नसल्याने त्यांच्या हाताला रोजगार राहत नाही आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो.दुष्काळ जाहीर करणे किंवा मदतीच्या घोषणा करणे पुरेसे नाही. शासनाकडून जाहीर होणारी मदत प्रत्यक्ष गरजू शेतकऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे. पिकांचे पंचनामे वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने झाले पाहिजेत. पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, पीकविमा आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळताना अनावश्यक अडथळे येऊ नयेत. दुष्काळग्रस्त भागातील परिस्थितीची गावनिहाय पाहणी करून प्रशासनाने वस्तुस्थितीच्या आधारे निर्णय घेणे गरजेचे आहे. मदतीसाठी शेतकऱ्याला वारंवार कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची वेळ येऊ नये, ही प्रशासनाची जबाबदारी आहे.दुष्काळाच्या काळात रोजगाराचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. शेतीची कामे थांबली की शेतमजूर आणि भूमिहीन कुटुंबांचे उत्पन्न बंद होते. अशा परिस्थितीत रोजगाराच्या माध्यमातून ग्रामीण कुटुंबांना आर्थिक आधार देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा आणि गावातील पाणीपुरवठ्याचे नियोजन याकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.मात्र दुष्काळावर मात करण्यासाठी केवळ टँकर, चारा किंवा तात्पुरत्या मदतीवर अवलंबून राहून चालणार नाही. पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत मुरविणे, नाला खोलीकरण, बंधारे, शेततळी, जलसंधारणाची कामे, ठिबक आणि तुषार सिंचन यांचा व्यापक वापर करणे आवश्यक आहे. गावागावात उपलब्ध पाण्याचे नियोजन केले तर भविष्यातील संकटाची तीव्रता कमी करता येऊ शकते. पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते गावाच्या परिसरातच कसे साठवता येईल, यावर स्थानिक पातळीवर नियोजन झाले पाहिजे.पावसाच्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर पीक पद्धतीतही बदल करणे आवश्यक आहे. उपलब्ध पाण्याचा विचार करून कमी कालावधीची आणि कमी पाण्यात तग धरणारी पिके, आंतरपीक पद्धती आणि शेतीपूरक व्यवसाय यांना प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे. पशुपालन, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन यांसारख्या व्यवसायांना बाजारपेठ, प्रशिक्षण आणि आर्थिक मदतीची जोड मिळाली तर शेतकऱ्याच्या उत्पन्नाला पर्यायी आधार मिळू शकतो.दुष्काळ हा केवळ शेतकऱ्याचा प्रश्न नाही. शेतकऱ्याचे उत्पन्न घटले की ग्रामीण बाजारपेठेतील खरेदी कमी होते. त्याचा परिणाम व्यापारी, दुकानदार, वाहतूकदार, मजूर आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेतील इतर घटकांवर होतो. त्यामुळे दुष्काळाकडे केवळ कृषी विभागाचा विषय म्हणून न पाहता संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचे संकट म्हणून पाहण्याची गरज आहे.दरवर्षी पावसाची अनिश्चितता आणि दुष्काळाची चर्चा होते. मात्र संकट आल्यानंतरच उपाययोजना करण्यापेक्षा पाऊस असतानाच पुढील संकटाचे नियोजन करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक गावाने आपल्या पाण्याचा, जमिनीचा आणि उपलब्ध संसाधनांचा विचार करून दीर्घकालीन जलव्यवस्थापन आराखडा तयार केला पाहिजे. शासनाने त्याला आवश्यक आर्थिक, तांत्रिक आणि प्रशासकीय पाठबळ दिले पाहिजे. ग्रामपंचायत, प्रशासन, शेतकरी संघटना आणि ग्रामस्थ यांनी एकत्रितपणे काम केले तर दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी निश्चितच मार्ग निर्माण होऊ शकतो.आज शेतकरी आभाळाकडे पाहत आहे. त्याच्या नजरेत केवळ पावसाची अपेक्षा नाही, तर आपल्या कष्टाला न्याय मिळावा आणि संकटाच्या काळात शासन आपल्या पाठीशी उभे राहावे, ही अपेक्षा आहे. दुष्काळ हा निसर्गाचा प्रश्न असला तरी त्याचा सामना करण्याची तयारी ही शासन आणि समाजाची जबाबदारी आहे. घोषणांपेक्षा प्रत्यक्ष मदत, तात्पुरत्या उपायांपेक्षा कायमस्वरूपी जलव्यवस्थापन आणि आश्वासनांपेक्षा वेळेत निर्णय हीच आजची खरी गरज आहे.शेतकरी वाचला तर शेती वाचेल, शेती वाचली तर ग्रामीण अर्थव्यवस्था वाचेल. त्यामुळे दुष्काळाकडे दुर्लक्ष करण्याची नव्हे, तर शेतकऱ्याच्या पाठीशी ठोसपणे उभे राहून आजच उपाययोजना करण्याची हीच वेळ आहे.

# अस्थी नदीत विसर्जित करण्या ऐवजी स्मृतींचे झाड लावू या!

## दु:खाला पर्यावरणाची दिशा आणि आठवणींना हिरवीगार सावली देण्याची वेळ आली आहे



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

माणूस या जगातून निघून जातो, पण त्याच्या आठवणी कधीच मरत नाहीत. आईच्या हातचा स्वयंपाक, वडिलांचा कडक शिस्तीचा धडा, भावाच्या खांद्यावरची साथ, बहिणीचे निरपेक्ष प्रेम, पत्नीची आयुष्यभराची सोबत, मुलाच्या चेहऱ्यावरचे निरागस हास्यमाणूस जातो, पण त्याच्याशी जोडलेल्या आठवणी आपल्या मनात कायम जिवंत राहतात. म्हणूनच आपल्या प्रिय व्यक्तीच्या स्मृती जपण्याची प्रत्येकाची धडपड असते. मात्र या स्मृती जपण्याची पद्धत काळानुसार बदलण्याची गरज आहे कां? हा प्रश्न आज पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर गंभीरपणे विचारला पाहिजे. प्रचलित परंपरेनुसार अंत्यसंस्कारानंतर अस्थी नदीमध्ये विसर्जित केल्या जातात. या प्रथेमागे श्रद्धा, भावना आणि सांस्कृतिक परंपरा आहेत. त्या भावनांचा अवमान करण्याचा प्रश्नच नाही. मात्र श्रद्धा आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष निर्माण होऊ नये, यासाठी पर्यावरणपूरक पर्याय शोधणे ही काळाची गरज आहे. प्रिय व्यक्तीच्या स्मृतीसाठी नदीत अस्थी विसर्जित करण्याऐवजी एखादे झाड लावले, तर त्या व्यक्तीची आठवण एका दिवसापुरती किंवा एका विधीपुरती मर्यादित न राहता वर्षानुवर्षे जिवंत राहू शकते. ही कल्पना केवळ पर्यावरणाचा विचार करणारी नाही, तर ती भावनेला नवा अर्थ देणारी आहे. कल्पना करा, एखाद्या आईच्या स्मृतीप्रित्यर्थ तिच्या मुलांनी एक वडाचे किंवा पिंपळाचे झाड लावले, काही वर्षांनी ते झाड मोठे झाले. त्याच्या सावलीत एखादा वृद्ध विसावला, एखाद्या विद्यार्थ्याने पुस्तक वाचले, एखाद्या पक्ष्याने घरटे बांधले, एखाद्या वाटसरूने उन्हापासून स्वतःचा बचाव केला. त्या प्रत्येक क्षणी त्या 'आई'ची आठवण एका नव्या अर्थाने जिवंत राहील. वडिलांच्या स्मृतीत लावलेले झाड मुलाला आयुष्यभर सांगत राहील तुमचे बाबा आज शरीराने नाहीत, पण त्यांनी दिलेली सावली अजूनही तुमच्यासोबत आहे. मग स्मृती जपण्याची यापेक्षा सुंदर पद्धत कोणती? अस्थी पाण्यात विलीन होतात, पण स्मृतींचे झाड मातीशी नाते जोडते, आकाशाकडे वाढते आणि पुढच्या पिढीला सावली देते. नद्या केवळ पाण्याचे प्रवाह नाहीत. त्या आपल्या संस्कृतीच्या साक्षीदार आहेत. अनेक शहरांचे, गावांचे आणि मानवी जीवनाचे अस्तित्व नद्यांशी जोडलेले आहे. त्यामुळे नदीची स्वच्छता ही केवळ पर्यावरणाची नव्हे, तर आपल्या सामूहिक संस्कृतीची जबाबदारी आहे. अंत्यसंस्कारानंतर अस्थी विसर्जनासोबत अनेकदा फुले, हार, कापड आणि इतर साहित्यही नदीत जाते. प्रत्येक कुटुंबामुळे मोठे प्रदूषण होते असे सरसकट म्हणणे योग्य ठरणार नाही, परंतु मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या धार्मिक व सामाजिक विधींमध्ये नदीत जाणारे अतिरिक्त साहित्य जलप्रदूषणाचा प्रश्न वाढवू शकते. म्हणून प्रश्न श्रद्धेचा नाही, श्रद्धेच्या पर्यावरणपूरक अभिव्यक्तीचा आहे. नदीला प्रदूषित न करता श्रद्धा व्यक्त करता येते का? होय, नक्कीच. परंपरा ही समाजाची सांस्कृतिक स्मृती असते. ती एका दिवसात बदलत नाही आणि बदल घडवून आणतांना कोणाच्याही श्रद्धेची खिल्ली उडवणे हा मार्ग असू शकत नाही. मात्र समाज बदलतो, विज्ञान पुढे जाते, पर्यावरणीय प्रश्न गंभीर होतात आणि त्यानुसार काही प्रथा नव्या स्वरूपात स्वीकारणे आवश्यक ठरते. कधीकाळी अनेक गोष्टी अपरिहार्य मानल्या जात होत्या. आज त्यांना पर्याय उपलब्ध झाले आहेत. तसेच अंत्यसंस्कारानंतरच्या स्मृती जपण्याच्या पद्धतीतही पर्यावरणपूरक पर्यायांचा विचार होऊ शकतो. परंपरा जपा, पण पर्यावरणाची किंमत मोजून नव्हे हा विचार समाजाने स्वीकारण्याची वेळ आली आहे.एखाद्या व्यक्तीच्या स्मृतीत झाड लावण्याची कल्पना व्यापक झाली, तर त्याचे अनेक सकारात्मक परिणाम होऊ शकतात. प्रत्येक कुटुंबाने एका प्रिय व्यक्तीच्या स्मरणार्थ एक झाड लावले, त्याची जबाबदारी घेतली आणि ते जगवले, तर काही वर्षांत हजारो नव्हे तर लाखो झाडे उभी राहू शकतात. मात्र केवळ झाड लावणे पुरेसे नाही. झाड जगवणे हीच खरी श्रद्धांजली आहे. फोटो काढून वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपला, तर त्याचा अर्थ नाही. त्या रोपट्याला पाणी कोण देणार? संरक्षण कोण करणार? जनावरांपासून त्याचे रक्षण कसे होणार? त्याची वाढ कोण पाहणार? या प्रश्नांची उत्तरेही तितकीच महत्त्वाची आहेत. कारण मृत व्यक्तीच्या नावाने झाड लावणे ही भावना आहे, पण ते झाड मोठे करणे ही जबाबदारी आहे.मृत्यू हा प्रत्येक कुटुंबासाठी वेदनादायी प्रसंग असतो. अशा वेळी तर्कापेक्षा भावना मोठी असते. त्यामुळे पर्यावरणपूरक पर्याय सांगताना संवेदनशीलता आवश्यक आहे. हे चुकीचे, ते बरोबर अशी भाषा न वापरता, आपण आणखी सुंदर काय करू शकतो? असा संवाद सुरू झाला पाहिजे. प्रिय व्यक्तीच्या स्मृतीने एक झाड लावणे म्हणजे मृत्यूच्या दु:खाला जीवनाच्या निर्मितीशी जोडणे होय. एक जीव गेला पण त्याच्या स्मृतीतून दुसऱ्या असंख्य जीवांना जगण्याची संधी मिळाली, तर त्या स्मृतीला अधिक व्यापक अर्थ प्राप्त होतो. पक्ष्याला घरटे मिळते, वाटसरूला सावली मिळते, हवेतील कार्बन शोषला जातो, मातीचे संरक्षण होते, परिसर हिरवा होतो आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रिय व्यक्तीची आठवण जिवंत राहते.आज आपल्याला स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे, आपल्या प्रिय व्यक्तीला आपण खरोखर काय देऊ शकतो? नदीत काही क्षणांसाठी विसर्जित होणारी आठवण की वर्षानुवर्षे सावली देणारे झाड? याचे उत्तर प्रत्येक कुटुंबाने आपल्या श्रद्धा, परंपरा आणि परिस्थितीनुसार ठरवावे. मात्र पर्यावरणपूरक पर्यायांचा विचार करण्यास कोणतीही हरकत नसावी. अस्थी विसर्जन हा श्रद्धेचा विषय असू शकतो, पण झाड लावणे ही भावनेसोबत भविष्यातील पिढ्यांप्रती असलेली जबाबदारीही आहे. आज आपल्या नद्या स्वच्छ ठेवण्याची आणि उद्याच्या पिढीसाठी हिरवे जग निर्माण करण्याची गरज आहे. म्हणूनच मृत व्यक्तीच्या स्मृतीला नदीच्या प्रवाहात सोडण्यापेक्षा त्या स्मृतीला एका रोपट्याच्या रूपाने मातीशी जोडण्याचा विचार समाजाने केला पाहिजे. कारण माणूस जातो, आठवणी राहतात आणि त्या आठवणींना जर झाडाचे रूप दिले, तर त्या केवळ मनात नाही तर निसर्गातही श्वास घेत राहतात.अस्थी विसर्जनापेक्षा स्मृतींचे वृक्षारोपण हा परंपरेचा अपमान नाही, तर दु:खाला जीवन देण्याचा आणि श्रद्धेला पर्यावरणाशी जोडण्याचा नवा विचार आहे. प्रिय व्यक्तीच्या स्मृतीसाठी एक झाड लावा ते जगवा आणि त्या झाडाच्या प्रत्येक पानात आपल्या माणसाची आठवण पुन्हा पुन्हा अनुभवत राहा. मी माझ्या आईच्या स्मृतीत एक झाड लावले आहे, आपणही आपल्या प्रिय व्यक्तीच्या स्मृतीत एक झाड लावा. कारण आठवणी केवळ मनात जपण्यापेक्षा त्या निसर्गात रुजवल्या, तर त्या पिढ्यान्पिढ्या सावली देत राहतात.

# मातंग समाजाची चालवलेली घोर फसवणूक

निळे प्रतीक न्यूज नेटवर्क



अनुसूचित जाती (SC) आरक्षणातील उपवर्गीकरणाचा विषय मातंग समाजातील काही दलाल पुढाऱ्यांच्या घशात उतरवून, समाजात उपवर्गीकरणाच्या नावाखाली एक कृत्रिम अस्मिता निर्माण करण्यात आली. मातंग समाजात असलेली प्रचंड अशिक्षितता, आर्थिक दुरावस्था आणि वर्षानुवर्षांची सामाजिक उपेक्षा यांमुळे समाजातील भोळाभाबडा वर्ग 'आपल्या पदरात काहीतरी पडेल' या आशेपोटी या विषयाच्या जाळ्यात अडकवला गेला.

आपण सर्वांनी एक मूलभूत सत्य लक्षात घेतले पाहिजे की, आंबेडकरवादी समूहामध्ये पुढारी, नेते अथवा कार्यकर्त्यांनी मांडलेल्या प्रत्येक भूमिकेची अत्यंत कठोर, तार्किक आणि वैचारिक चिकित्सा केली जाते; तदनंतरच त्या भूमिकेला व्यापक लोकमान्यता मिळते. दुर्दैवाने, मातंग समाजात आंबेडकरवादी समूहाप्रमाणे समाजाला प्रामाणिक व निस्वार्थी मार्गदर्शन करणारा अभ्यासक, बुद्धिमान वर्ग अद्याप मोठ्या प्रमाणावर पुढे येऊ शकलेला नाही. जिथे असा अभ्यासक वर्ग अस्तित्वात आहे, तिथे हिंदुत्ववादी शक्तींकडून त्यांची सतत गळचेपी केली जात असल्याचे विदारक चित्र सातत्याने पाहायला मिळते. या विघातक शक्तींच्या दबावामुळे हा अभ्यासक वर्ग मातंग समाजाला योग्य दिशा देण्यात कमी पडतो आहे.मुळात, आरक्षण उपवर्गीकरणाचा हा विषय म्हणजे सामाजिक न्याय विभागाचा कोट्यवधी रुपयांचा निधी 'लाडकी बहीण' योजनेकडे वळवल्यामुळे, विविध योजनांची होत नसलेली अंमलबजावणी, स्कॉलरशिपचे प्रश्न इ. विषयी अनुसूचित जातींमध्ये उफाळून येणारा संघटित प्रक्षोभ दुसरीकडे वळवण्यासाठी सरकारने रचलेला निव्वळ एक फार्स आहे. या कपटकारस्थानात मातंग समाजातील काही दलाल नेत्यांनी उभ्या केलेल्या खोट्या चित्रामुळे सुरुवातीला सरकारला काही प्रमाणात यशही मिळाले.

मात्र, १० एप्रिल २०२६ पासून आपण सर्वांनी याविरोधात छेडलेल्या अभूतपूर्व रणकंदनामुळे आता सरकारला अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करणे कोणत्याही परिस्थितीत शक्य राहिलेले नाही. स्वतः विद्यमान सामाजिक न्याय मंत्री आयु. संजय शिरसाट साहेब, आयु. राजकुमार बडोले साहेब, आयु. चंद्रकांत हंडोरे साहेब व आयु. बबनराव घोलप साहेब या सर्व माजी सामाजिक न्याय मंत्र्यांनी अनुसूचित जाती उपवर्गीकरणाला कडाडून विरोध दर्शवला आहे. विद्यमान सामाजिक न्यायमंत्र्यांनी तर उघडपणे या उपवर्गीकरणाला नकार दिला आहे. त्यातच मातंग समाजातील दलाल पुढाऱ्यांनी विविध मोर्च्यांमधून आयु. संजय शिरसाट यांच्यावर अत्यंत असभ्य टीका केल्यामुळे हे नेते आता त्यांच्याकडे जाण्याचे तोंड शिल्लक ठेवू शकलेले नाहीत; पर्यायाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे जाण्याचा त्यांचा मार्गही पूर्णपणे खुंटला आहे.

दुसरीकडे, आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात तीव्र लढा उभारला गेला. बीड येथून आपण काढलेला ऐतिहासिक 'लाँग मार्च' असो किंवा त्यानंतर सरसेनानी आयु. आनंदराज आंबेडकर साहेब व आयु. भीमराव आंबेडकर साहेब यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात निघालेले लाखोंचे विराट मोर्चे असोत; किंवा अनुसूचित जातीच्या आमदारांच्या घरावर नेलेल्या मोर्चांमुळे; या सर्वांची परिणती विधिमंडळाच्या अधिवेशनात दिसून आली. तब्बल २७ अनुसूचित जातींच्या आमदारांनी उपवर्गीकरणाला प्रचंड विरोध करत यासंदर्भात स्थगन प्रस्ताव मांडला. परिणामी, विद्यमान मुख्यमंत्रीही बॅकफूटवर गेले. त्यांनी आपल्या राजकीय टोपीतून काढलेला पत्ता काही कामाचा उरला नसल्याचे लक्षात येताच, तो मुकाट्याने पुन्हा टोपीत ठेवून दिला. त्यामुळे मुख्यमंत्र्यांकडे जाण्याचा मार्गही या दलाल नेत्यांसाठी बंद झाला आहे.

आंबेडकर समूहाचे प्रमुख नेते आदरणीय आयु. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर साहेब, आयु. रामदास आठवले साहेब यांनी देखील अशाप्रकारच्या अन्यायकारक कृतीला थारा दिलेला नाही. आंबेडकर समूह हा एकजातीय समूह नसून तो वैचारिक समूह आहे.

त्याचप्रमाणे, आयु. असदुद्दीन ओवैसी साहेबांच्या पक्षाने देखील उपवर्गीकरणाला विरोध असल्याचे स्पष्ट केले आहे. मराठा आंदोलक आयु. मनोज जरांगे पाटील साहेबांनी देखील याविषयी हस्तक्षेप करणार नसल्याचे म्हटले होते. ओबीसी चळवळीने तर थेट विरोधच दर्शवला आहे. कारण, अनुसूचित जाती उपवर्गीकरण झाल्यास पुढचा नंबर रोहिणी आयोगाच्या अनुषंगाने ओबीसी समूहाचाच असणार आहे. त्यामुळे त्यांचा कायम नैसर्गिक विरोध अशा प्रकारच्या उपवर्गीकरणाला असणार आहे.

तसेच, उपमुख्यमंत्री आयु. सुनेत्रा वहिनी पवार आणि त्यांच्या पक्षाने यावर कोणतेही भाष्य केलेले नाही वा कोणतीही भूमिका घेतलेली नाही; कारण या विषयात उडी घेतल्यास फायद्यापेक्षा राजकीय नुकसानच अधिक होईल, याची त्यांना अचूक जाणीव आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) दारात जाण्याचा रस्ताही या नेत्यांसाठी उरलेला नाही. याच हताशेतून, आरक्षण उपवर्गीकरणाशी काडीचाही संबंध नसलेल्या जलसंपदा मंत्र्यांकडे जाऊन या नेत्यांना मान खाली घालून निवेदने देण्याची नामुष्की पत्करावी लागली. तर अशाप्रकारे सातत्याने हिंदुत्ववादी शक्तींकडून मातंग समाजाचे घोर फसवणूक चालवलेली आहे. जी गोष्ट चुकीची आहे त्याला चूक म्हणण्याची आपण तयारी ठेवायला हवी. मातंग समाजातील दलाल नेत्यांमुळे आपण एका जातीय कोषामध्ये एकटे पडत चाललो आहोत याची भेदक जाणीव आता मातंग समाजातील अभ्यासक विचारवंत यांच्यामध्ये येऊ लागली आहे.

मंत्रालयापासून ते मुंबईतील मोर्च्यांपर्यंत मातंग समाजातील प्रामाणिक तरुण बंधू-भगिनींच्या नजरेतून ही बाब सुटलेली नाही. प्रशासकीय वर्तुळातून तसेच मातंग समाजातील सहकाऱ्यांकडून ही वस्तुस्थिती थेट समोर आली असून, आता मातंग समाजात या दलाल नेत्यांविषयी तीव्र चीड आणि संताप उसळला आहे. आपली घोर फसवणूक झाल्याचे समाजाच्या पदोपदी लक्षात येत आहे.

या पार्श्वभूमीवर माझी तमाम आंबेडकरवादी समूहाला हात जोडून विनंती आहे की, आपल्या ज्या मातंग बंधू-भगिनींना या राजकीय षड्यंत्राची आणि चुकांची जाणीव झाली आहे, त्यांना टोचून किंवा डिचवून आपल्यापासून दूर लोटू नका; उलट तथागत बुद्धाच्या अथांग करुणेने त्यांना हृदयाशी कवटाळून सोबत घ्या.

मातंग समाजातील भोळ्या जनतेला मुंबईत नेऊन मनस्तापाला बळी पाडणे हे अत्यंत क्लेशदायक होते. मुंबईतील या मोर्च्याच्या निमित्ताने अनेक गोष्टींचा पर्दाफाश झाला. मी उपवर्गीकरणाच्या विरोधातील लढा सुरू करण्यापूर्वी सलग १५ दिवस महाराष्ट्रातील विविध जिल्हे आणि तालुक्यांतील माझ्या संपर्कात असलेल्या २०० ते ३०० उच्चशिक्षित मातंग सहकाऱ्यांशी सविस्तर संवाद साधत होतो. त्या सर्वांनी मला एकमुखाने सांगितले की, हा लढा म्हणजे भाजप-संघाच्या वळचणीला गेलेल्या काही दलाल नेत्यांचा वैयक्तिक अजेंडा आहे; आम्ही अशा कोणत्याही आत्मघातकी आणि मूर्खपणाच्या कृत्यात सहभागी होणार नाही. सोशल मीडियावरून सुरू असलेली गरळओक ही केवळ बनावट खात्यांवरून (Fake Accounts) चालवली जात असल्याचे सुजाण वर्गाला कळून चुकले होते. त्यामुळेच मुंबईतील मोर्च्याकडे मातंग समाजातील विचारवंत, सुशिक्षित आणि स्वाभिमानी घटकाने पूर्णपणे पाठ फिरवली. आरक्षण उपवर्गीकरणाचा हा लढा मातंग समाजाचा नसून, त्यात शिरलेल्या दलालांचा आहे, हेच यातून सिद्ध झाले.मुळात उपवर्गीकरणाचा हा खटाटोप का सुरू करण्यात आला, याच्या मुळाशी गेले तर भयावह वास्तव समोर येते. गेल्या पाच वर्षांत मातंग समाजातील तब्बल ५ लाख बंधू-भगिनींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन समतेच्या बौद्ध धम्माचा स्वीकार केला आहे. त्यामुळे हिंदुत्वाचे राजकीय ओझे वाहण्यासाठी मातंग समाजातील तरुण पिढी यापुढे उपलब्ध राहणार नाही, या भयापोटी समाजाला ब्लॅकमेल करण्यासाठी हा कट रचला गेला आहे. जर तुम्ही बौद्ध आणि आंबेडकरवादी समूहाच्या सोबतीने भारतीय संविधानाच्या मार्गाने जाल, तर तुमचेही खच्चीकरण केले जाईल, अशी एक सुप्त आणि विकृत चेतावणीच या उपवर्गीकरणाच्या डावातून मातंग समाजाला दिली जात आहे. हा डाव वेळीच ओळखून मातंग समाजाने फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे, हीच काळाची खरी गरज आहे.

–विश्वदिप करंजीकर

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक रतन नामदेव साळवे यांनी सोलापूर तरूण भारत मिडिया लि., प्लॉट नं. १/३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को. ऑप सोसायटी लि. एमआयडीसी, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र- ४३१००१) येथे छापून एफ-४/ १४, अयोध्या नगर, एन -७, सिडको छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र- ४३१००१) येथे प्रसिद्ध केले. ✻ संपादक : रतन नामदेव साळवे, मो. ९९२३५०२३२०, E-nilepratik02@gmail.com

# लोकसहभागाने सेवा संकल्प अभियानाचा जागर

## गावागावांत श्रमदानातून सामाजिक बांधिलकीचा संदेश

निळे प्रतीक न्यूज नेटवर्क

**परभणी । प्रतिनिधी**

जिल्ह्यात सुरू असलेल्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत ग्रामपंचायत, शाळा, आरोग्य संस्था आणि नागरिकांच्या सहभागातून विविध लोकाभिमुख उपक्रम उत्साहात राबविण्यात येत आहेत. श्रमदान व स्वच्छता मोहिमा, आरोग्य शिबिरे, मानवी साखळी, वक्तृत्व व चित्रकला स्पर्धा अशा विविध उपक्रमांतून स्वच्छता, आरोग्य, सामाजिक बांधिलकी आणि जनजागृतीचा संदेश देण्यात येत आहे.

जिल्ह्यात सेवा संकल्प अभियान जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. त्याला विद्यार्थी, तरुण वर्ग आणि गावकऱ्यांचाही मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभत आहे.

जिल्हा परिषद परभणी आणि स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, पंचायत समिती सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने आज सेवा संकल्प अभियान अंतर्गत ग्रामपंचायत ब्रम्हवाकडी येथे एक दिवस एक तास, श्रमदान मोहीम राबविण्यात आली. यावेळी स्वच्छताग्रही सतीश शेरे, पालक अधिकारी अनिल मुळे, ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती हेळगिरे, नानाभाऊ वणवे, स्वच्छ भारत मिशनचे समन्वयक डी आर कामीटे व गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

पालम तालुक्यातील शेखराजूर आणि धनेवाडी येथे गावकऱ्यांच्या सहभागातून श्रमदान मोहीम राबविण्यात आली. जिंतूर तालुक्यातील निवळी खुर्द येथेही सेवा संकल्प अभियानांतर्गत श्रमदान करण्यात आले तर पाथरी तालुक्यातील कानसूर येथे 'श्रमदान दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला.

ग्रामपंचायत वझर बुद्रुक येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आपले विचार मांडत सामाजिक संदेश दिला. वझर बुद्रूक येथे विविध स्पर्धांच्या माध्यमातून स्वच्छता मोहिम राबवत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यात आला आहे.



सेवा संकल्प अभियानांतर्गत आयुष्मान आरोग्य मंदिर, चुडावा येथे 'आरोग्य सेवा संकल्प अभियान शिबिर-२०२६' आयोजित करण्यात आले होते. तसेच उपकेंद्र आरखेड येथेही आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्यविषयक सेवा व मार्गदर्शन करण्यात आले.

कानसूर येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. मानवी साखळी, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आदी उपक्रमांतून नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक विषयांबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.मानवत तालुक्यातील सरोदेसावळी येथे आयोजित आरोग्य उपक्रमात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. शिबिरातील पहिल्या महिला रक्तदात्या म्हणून श्रीमती सरोदे यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला. तसेच रत्नापूर येथेही सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले.

सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टाकळी कुंभकर्ण येथे विविध उपक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग राहिल्याने अभियानाला शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची जोड मिळाली. गावागावांत नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी व आरोग्य यंत्रणेच्या सहभागातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांमुळे 'सेवा संकल्प' हा केवळ अभियान न राहता लोकसहभागातून सामाजिक परिवर्तनाची चळवळ बनत असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून येत आहे.

# आंबेडकरवादी विचारविश्वासमोर गंभीर प्रश्न ?

निळे प्रतीक न्यूज नेटवर्क

२९ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, एका अज्ञात सोशल मीडिया पोस्टमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, गेल ऑम्व्हेट, ब्रजरंजन मणी, शर्मिला रेगे यांच्यासह अनेक लेखकांच्या ग्रंथांना 'पॉयझन' म्हणजे 'विष' असे संबोधण्यात आले आहे. हे अनाकलनियच नव्हे तर भयानक आहे! त्यानंतर पंतप्रधान कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देत उच्च शिक्षण विभागाने केंद्रीय विद्यापीठांकडून संबंधित अभ्यासक्रमांबाबत अभिप्राय तसेच त्या अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशसंख्येची माहिती मागितल्याचे त्या वृत्तात नमूद करण्यात आले आहे. या अज्ञात व्यक्तीच्या पोस्टची एवढ्या तातडीने पंतप्रधान कार्यालयाने दखल घ्यावी हे तर निकोप लोकशाहीसाठी अजूनच गंभीर आहे. या वृत्तानुसार, हा पत्रव्यवहार २७ सप्टेंबर रोजी केंद्रीय विद्यापीठांकडे पाठविण्यात आला आणि त्याला 'तातडीचे' स्वरूप देण्यात आले. भारतीय लोकशाहीची खरी ताकद केवळ निवडणुका, संसद किंवा सरकारच्या संस्थात्मक अस्तित्वात नसते; ती प्रश्न विचारण्याच्या स्वातंत्र्यात, असहमतीच्या अधिकारात आणि ज्ञानाच्या मुक्त देवाणघेवाणीतही असते. विद्यापीठ हे या लोकशाही संस्कृतीचे अत्यंत महत्त्वाचे बौद्धिक केंद्र आहे. त्यामुळे विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात कोणते ग्रंथ असावेत, कोणते विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले जावेत आणि कोणत्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास केला जावा, हा प्रश्न अत्यंत संवेदनशील आहे.

या घटनेचे गांभीर्य एखाद्या पुस्तकाचा अभ्यासक्रमात समावेश ठेवायचा की नाही, एवढ्यापुरते मर्यादित नाही. या प्रक्रियेमुळे विद्यापीठीय स्वायत्तता, शैक्षणिक विवेक, बौद्धिक बहुवाद आणि आंबेडकरवादी विचारांच्या अकादमिक स्थानासंबंधी काही मूलभूत प्रश्न उपस्थित होतात. एखाद्या ग्रंथाशी असहमती असणे ही लोकशाहीतील स्वाभाविक बाब आहे; परंतु त्या असहमतीच्या आधारे त्या ग्रंथाच्या विद्यापीठीय अभ्यासालाच संशयाच्या भोवऱ्यात उभे करणे ही त्यापेक्षा भयंकर बाब आहे. विद्यापीठाच्या वर्गात एखाद्या विचाराचा अभ्यास केला जातो, याचा अर्थ त्या विचाराचा स्वीकार करण्याची विद्यार्थ्यांवर सक्ती केली जाते, असा अर्थ काढणे शैक्षणिक प्रक्रियेच्या स्वरूपाचे अतिसुलभीकरण ठरेल.२६ सप्टेंबरला प्रसारित झालेल्या संबंधित पोस्टमध्ये 'अनिहिलेशन ऑफ कास्ट', 'गुलामगिरी', शर्मिला रेगे यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनावरील संकलन, ब्रजरंजन मणी यांचे 'डीब्राह्मनायजिंग हिस्टरी', गेल ऑम्व्हेट यांची पुस्तके, पेरियार रामासामी, सावित्रीबाई फुले, आर. एस. शर्मा, उमा चक्रवर्ती, सुवीरा जैस्वाल आणि इतर लेखकांच्या ग्रंथांचा उल्लेख करण्यात आला आहे. या यादीत रामायण आणि महाभारताचाही समावेश होता. पोस्टमध्ये या विविध ग्रंथांना एकाच चौकटीत ठेवून त्यांच्याविषयी 'पॉयझन' आणि 'अँटी-हिंदू प्रॉपॅगॅन्डा' यांसारखी भाषा वापरण्यात आली असल्याचे वृत्तात नमूद आहे. याठिकाणी एक मूलभूत फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. एखाद्या ग्रंथाच्या आशयावर आक्षेप घेणे आणि त्या ग्रंथाच्या अभ्यासालाच अनुचित ठरवणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. 'अनिहिलेशन ऑफ कास्ट' वाचणे म्हणजे विद्यार्थ्याने जातिव्यवस्थेविषयी डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका स्वीकारलीच पाहिजे, असे नाही. 'गुलामगिरी' वाचणे म्हणजे विद्यार्थ्याला एखाद्या विशिष्ट राजकीय भूमिकेत ढकलणे नव्हे. पेरियार, फुले, आंबेडकर, शर्मिला रेगे किंवा गेल ऑम्व्हेट यांचे लेखन अभ्यासणे म्हणजे त्यांच्याशी सहमत होण्याची सक्ती नव्हे. विद्यापीठाचे मूलभूत कार्य विद्यार्थ्यांना तयार निष्कर्ष देणे नसून त्यांना विविध विचार समजून घेण्याची, त्यांची चिकित्सा करण्याची, पुराव्यांची तपासणी करण्याची आणि स्वतःचे निष्कर्ष घडविण्याची बौद्धिक क्षमता देणे हे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन भारतीय समाजाच्या मूलभूत प्रश्नांशी निगडित आहे. जात, सामाजिक विषमता, धार्मिक संरचना, संविधानवाद, लोकशाही, स्त्री-पुरुष समानता, प्रतिनिधित्व, आर्थिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठा या प्रश्नांवर त्यांनी मूलभूत चिंतन केले. 'अनिहिलेशन ऑफ कास्ट' हा ग्रंथ विद्यापीठात शिकवला जात असेल, तर त्याचा अर्थ विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरांच्या प्रत्येक निष्कर्षाशी सहमत व्हावे असा होत नाही. उलट, त्यातील ऐतिहासिक संदर्भ, तर्करचना, समाजविश्लेषण, मर्यादा आणि त्यावर झालेले प्रतिवाद यांचा अभ्यास होणे अपेक्षित आहे. एखाद्या विचाराशी असहमती असेल तर त्या असहमतीला शैक्षणिक रूप देण्यासाठी अधिक सखोल वाचन, संशोधन आणि प्रतिवाद आवश्यक असतो. एखाद्या ग्रंथाला न वाचता त्यावर मत बनविणे ही बौद्धिक चिकित्सा ठरत नाही.

या प्रकरणात आंबेडकरवादी साहित्याला सरसकट 'डावे' ठरविण्याचाही प्रश्न उपस्थित होतो. संबंधित वृत्तानुसार, सूचीतील अनेक लेखकांनी पारंपरिक भारतीय डाव्या विचारसरणीचीही जात आणि लिंगाच्या प्रश्नांच्या संदर्भात चिकित्सा केली आहे. त्यामुळे आंबेडकरवादाला डाव्या विचारसरणीच्या एका तयार चौकटीत बसविणे हे त्याच्या स्वतंत्र वैचारिक स्वरूपाचे संकुचन ठरू शकते. डॉ. आंबेडकरांचे चिंतन स्वतःची स्वतंत्र वैचारिक परंपरा आहे. त्यांनी मार्क्सवादी विचारातील काही मूलभूत संकल्पनांवर टीका केली; परंतु आर्थिक विषमता, श्रम, सामाजिक न्याय, राज्यव्यवस्था आणि शोषण यांसारख्या प्रश्नांवरही सखोल विचार केला. म्हणूनच आंबेडकरवादाचे मूल्यांकन करण्यासाठी त्याला कोणत्याही एका राजकीय कप्प्यात बंदिस्त करण्याऐवजी त्याच्या स्वतःच्या ऐतिहासिक आणि तात्त्विक संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे.

विद्यापीठ हा 'सहमतीचा कारखाना' नसतो. तिथे विद्यार्थ्यांना एका विशिष्ट विचारधारेचे अनुयायी तयार करण्याचे काम होत नाही आणि त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना अस्वस्थ करणारे किंवा प्रस्थापित समजुतींना आव्हान देणारे विचार त्यांच्यापासून लपविणेही विद्यापीठाचे कार्य नाही. भारतीय समाज समजून घेण्यासाठी मनुस्मृतीचा अभ्यास आवश्यक असेल तर तो झाला पाहिजे; त्याचबरोबर तिच्यावर झालेली डॉ. आंबेडकरांची चिकित्सा देखील अभ्यासली पाहिजे. रामायण आणि महाभारताचा अभ्यास झाला पाहिजे; त्याचबरोबर त्यांचे ऐतिहासिक, सांस्कृतिक, स्त्रीवादी, दलित, बहुजन आणि विविध वैचारिक वाचनही विद्यार्थ्यांसमोर आले पाहिजे. फुले, आंबेडकर, पेरियार, सावित्रीबाई फुले, गांधी, मार्क्स आणि अन्य विचारवंतांचे लेखनही विविध संदर्भांसह अभ्यासता येते. कारण वाचन म्हणजे स्वीकार नव्हे; वाचन म्हणजे एखाद्या विचाराला समजून घेण्याची पहिली पायरी आहे.

याठिकाणी विद्यापीठांच्या अभ्यासक्रमनिर्मितीची संस्थात्मक प्रक्रिया विशेष महत्त्वाची ठरते. युजीसीच्या उपलब्ध नियमांनुसार उच्च शिक्षणातील शैक्षणिक बाबींमध्ये अकॅडेमिक कौन्सिल आणि बोर्ड ऑफ स्टडीज यांसारख्या संस्थांची भूमिका निश्चित करण्यात आलेली आहे. युजीसीच्या नियमांमध्ये बोर्ड ऑफ स्टडीज कडून अभ्यासक्रम तयार करून तो अकॅडेमिक कौन्सिलच्या मान्यतेसाठी सादर करण्याची प्रक्रिया नमूद आहे; अकॅडेमिक कौन्सिलला अभ्यासक्रम, अभ्यासक्रमिका आणि त्यातील बदलांची छाननी व मान्यता देण्याचे अधिकार दिलेले आहेत. युजीसी स्वतः उच्च शिक्षणातील अध्यापन, परीक्षा आणि संशोधनाचे मानक निश्चित व समन्वयित करणारी वैधानिक संस्था असल्याचे सांगते. त्यामुळे एखाद्या अभ्यासक्रमाविषयी आक्षेप निर्माण झाल्यास त्याचे परीक्षण करण्यासाठी शैक्षणिक आणि वैधानिक संस्थात्मक प्रक्रिया अस्तित्वात आहेत, हे महत्त्वाचे आहे.

प्रश्न असा नाही की अभ्यासक्रमावर प्रश्न उपस्थित करू नयेत. प्रश्न असा आहे की ते प्रश्न कोणत्या प्रक्रियेतून, कोणत्या निकषांवर आणि कोणत्या शैक्षणिक संस्थांकडून तपासले जावेत. युजीसीच्या नियमांमध्ये अभ्यासक्रमाशी संबंधित निर्णयप्रक्रियेत अकॅडेमिक कौन्सिल आणि बोर्ड ऑफ स्टडीज यांसारख्या शैक्षणिक संस्थांना दिलेले स्थान याच संदर्भात महत्त्वाचे ठरते. एखाद्या ग्रंथातील ऐतिहासिक दावा चुकीचा आहे असे वाटत असेल तर त्याची शैक्षणिक चिकित्सा केली जाऊ शकते. एखाद्या लेखकाच्या भूमिकेला प्रतिवाद असेल तर त्यावरील संशोधन अभ्यासक्रमात समाविष्ट केले जाऊ शकते. एखाद्या ग्रंथात वैचारिक मर्यादा असतील तर त्या विद्यार्थ्यांसमोर स्पष्टपणे मांडल्या जाऊ शकतात. पण एखाद्या अज्ञात सोशल मीडिया पोस्टमध्ये एखाद्या ग्रंथाला 'विष' म्हटले गेले म्हणून त्याच्या विद्यापीठीय स्थानाची प्रशासनिक चौकशी सुरू होणे, ही प्रक्रिया अकादमिक स्वायत्ततेच्या दृष्टीने गंभीर चर्चेचा विषय बनते.

अज्ञात आक्षेपाला संस्थात्मक वजन मिळण्याच्या प्रक्रियेबाबतही सावधपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. लोकशाहीत कोणत्याही नागरिकाला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. एखाद्या ग्रंथाविषयी तक्रार करण्याचाही अधिकार आहे; परंतु तक्रार आणि शैक्षणिक निर्णय यांच्यामध्ये तज्ज्ञ परीक्षणाची, पुराव्याधारित मूल्यांकनाची आणि संस्थात्मक उत्तरदायित्वाची प्रक्रिया असणे आवश्यक आहे. अन्यथा भविष्यात सोशल मीडिया मोहिमांद्वारे अभ्यासक्रमांवर दबाव निर्माण करण्याची पद्धत वाढू शकते. आज आंबेडकरांचे लेखन, उद्या फुलेंचे, परवा पेरियारांचे, त्यानंतर स्त्रीवादी किंवा आदिवासी अभ्यासाचे ग्रंथ अशा क्रमाने कोणत्याही वैचारिक साहित्याला आक्षेप घेता येऊ शकतो. अशा परिस्थितीत 'सोशल मीडिया आक्षेप फ प्रशासनिक चौकशी फ विद्यापीठाकडून स्पष्टीकरण' अशी साखळी रूढ झाली, तर अभ्यासक्रमनिर्मितीतील तज्ज्ञ संस्थांची भूमिका हळूहळू कमकुवत होण्याची शक्यता निर्माण होईल. हा मुद्दा कोणत्याही एका राजकीय पक्षाच्या समर्थनाचा किंवा विरोधाचा नसून विद्यापीठीय स्वायत्तता आणि शैक्षणिक प्रक्रियेच्या स्वरूपाचा आहे.

आंबेडकरवादी विचारविश्वाचे वैशिष्ट्य असे आहे की ते सामाजिक वास्तवाला प्रश्न विचारते. जात का निर्माण झाली, ती कशी टिकून राहिली, मानवी प्रतिष्ठेचे मूल्य जन्मावर अवलंबून असावे का, स्त्री-पुरुष समानतेचा सामाजिक अर्थ काय, लोकशाही केवळ मतदानाची पद्धत आहे की जीवनमूल्य, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे परस्परसंबंध काय, धर्म आणि सामाजिक न्याय यांच्यातील नाते कसे समजावे, असे प्रश्न या विचारविश्वातून उपस्थित होतात. हे प्रश्न काहींना अस्वस्थ करू शकतात. परंतु अस्वस्थ करणारा प्रश्न हा स्वतःमध्ये 'विष' ठरत नाही. तो ज्ञानाच्या प्रक्रियेची सुरुवातही ठरू शकतो. विद्यापीठाचे काम विद्यार्थ्यांना अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांपासून दूर ठेवणे नसून त्या प्रश्नांचा तर्क, पुरावे आणि विविध दृष्टिकोनांच्या आधारे विचार करण्याची क्षमता विकसित करणे आहे.

या संदर्भात एक महत्त्वाचा सकारात्मक मार्गही पुढे येतो. जर कोणाला वाटत असेल की आंबेडकर, फुले, पेरियार किंवा अन्य विचारवंतांच्या लेखनात एकतर्फीपणा आहे, तर त्यावर विद्यापीठात परिसंवाद व्हावेत. जर एखाद्या ग्रंथातील ऐतिहासिक दावे विवादित असतील तर त्यावरील संशोधन विद्यार्थ्यांना वाचायला दिले जावे. जर एखाद्या लेखकाच्या भूमिकेला प्रतिवाद करणारे गंभीर संशोधन उपलब्ध असेल तर तेही अभ्यासक्रमात आणले जावे. जर एखाद्या ग्रंथात वैचारिक मर्यादा असतील तर त्या स्पष्टपणे शिकवल्या जाव्यात. अशा पद्धतीने अभ्यासक्रम अधिक समृद्ध होईल. ग्रंथाला 'विष' घोषित करून त्याचा अभ्यास संशयास्पद ठरविण्यापेक्षा त्याच्या सभोवती अधिक व्यापक वाचन, प्रतिवाचन आणि चिकित्सक चर्चा निर्माण करणे ही अधिक शैक्षणिक पद्धत ठरते.

या प्रकरणाकडे फक्त 'आंबेडकरवादी विरुद्ध विरोधक' अशा द्वंद्वात्मक चौकटीत पाहणेही अपुरे ठरेल. मूलभूत प्रश्न अधिक व्यापक आहे. भारतीय विद्यापीठे विचारांच्या मुक्त देवाणघेवाणीची आणि बौद्धिक प्रयोगांची केंद्रे राहणार आहेत की सार्वजनिक दबाव आणि प्रशासनिक संवेदनशीलतेनुसार अभ्यासक्रमांचे पुनर्मूल्यांकन करणाऱ्या संस्था बनणार आहेत? हा प्रश्न फक्त आंबेडकरवादी साहित्याचा नाही. उद्या कोणत्याही अन्य वैचारिक परंपरेवरही अशाच प्रकारची प्रक्रिया लागू होऊ शकते. म्हणूनच या प्रश्नाकडे लेखक, विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, इतिहासकार आणि विद्यापीठीय संस्था या सर्वांनी शैक्षणिक स्वायत्ततेच्या व्यापक संदर्भात पाहणे आवश्यक आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशी असहमती असू शकते. त्यांच्या इतिहासवाचनावर टीका करता येते. त्यांच्या सामाजिक विश्लेषणाशी वाद घालता येतो. त्यांच्या निष्कर्षांना आव्हान देता येते; परंतु त्यासाठी डॉ. आंबेडकरांना विद्यापीठाच्या वर्गाबाहेर ठेवण्याची आवश्यकता नाही. डॉ. आंबेडकरांच्या विचारांना उत्तर देण्याचा सर्वांत प्रभावी मार्ग म्हणजे त्यांचे अधिक सखोल वाचन, त्यांची चिकित्सा आणि त्यांच्यावरील अधिक गंभीर प्रतिवाद. फुलेंशी असहमती असेल तर फुले अधिक वाचावे लागतील; पेरियारांच्या तर्कवादाशी मतभेद असेल तर पेरियारांचा अधिक चिकित्सक अभ्यास करावा लागेल; शर्मिला रेगे यांच्या विश्लेषणाशी असहमती असेल तर स्त्रीवाद, जात आणि सामाजिक संरचना यांवरील अधिक व्यापक संशोधन विद्यार्थ्यांसमोर ठेवावे लागेल; गेल ऑम्व्हेट यांच्या निष्कर्षांशी मतभेद असेल तर त्यावर संशोधनाधारित प्रतिवाद उभा करावा लागेल. ग्रंथावर प्रशासकीय दबाव हा बौद्धिक प्रतिवादाचा पर्याय होऊ शकत नाही. प्रतिवादाला ज्ञान, पुरावे आणि तर्काची आवश्यकता असते.

या घटनेमुळे आंबेडकरवादी चळवळ आणि साहित्यविश्वासमोरही एक महत्त्वाचे आव्हान उभे राहते. भावनिक प्रतिक्रियेच्या पलीकडे जाऊन अकादमिक पातळीवर अधिक मजबूत संशोधनपरंपरा उभी करणे आवश्यक आहे. विद्यापीठांमध्ये आंबेडकर अभ्यासकांचे संशोधन अधिक बळकट झाले पाहिजे. आंबेडकरवादी साहित्याचे उत्कृष्ट अनुवाद झाले पाहिजेत. संदर्भग्रंथ, समीक्षाग्रंथ, संशोधनपर लेख, डिजिटल संग्रह आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यास वाढला पाहिजे. आंबेडकरवादी साहित्याने स्वतःचे सौंदर्यशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहासदृष्टी आणि समीक्षा-परंपरा अधिक सशक्त केली पाहिजे. कारण एखाद्या विचारधारेचे संरक्षण केवळ घोषणांनी दीर्घकाळ होत नाही; विचाराचे संरक्षण विचारांच्या सामर्थ्यानेच होते.

तथापि, या घटनेबाबत एक तथ्यात्मक मर्यादा स्पष्ट ठेवणेही आवश्यक आहे. उपलब्ध वृत्तानुसार, केंद्रीय विद्यापीठांकडून संबंधित अभ्यासक्रमांबाबत अभिप्राय आणि विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची माहिती मागविण्यात आली आहे; अशा ग्रंथांविषयीची चौकशी कोणत्या प्रक्रियेतून, कोणत्या निकषांवर आणि कोणत्या संस्थात्मक अधिकाराच्या चौकटीत केली जात आहे, याचे स्पष्टीकरण सरकारकडून यायला हवे. याच ठिकाणी भारतीय विद्यापीठीय संस्कृतीची खरी कसोटी आहे. विद्यार्थ्याच्या हातात पुस्तक असावे की भीती? त्याच्या मनात प्रश्न असावा की पूर्वनिर्धारित उत्तर? त्याच्या वाचनालयात आंबेडकर असावेत की आंबेडकरांविषयी बोलण्याची परवानगी आधी घ्यावी लागावी? या प्रश्नांची उत्तरे कोणत्याही अज्ञात सोशल मीडिया खात्याने देऊ नयेत. ती शैक्षणिक स्वायत्तता, तज्ज्ञता, चिकित्सक विचार, घटनात्मक मूल्ये आणि मुक्त बौद्धिक संवाद यांच्या आधारे शोधली गेली पाहिजेत.आंबेडकरवादी विचारांचे सामर्थ्यच मुळात यामध्ये आहे की तो प्रश्नांना घाबरत नाही. म्हणून आंबेडकरवादी साहित्याला प्रश्न विचारले जावेत, त्यावर टीका केली जावी, त्याच्या मर्यादा शोधल्या जाव्यात, त्याला प्रतिवाद केला जावा; परंतु हे सर्व त्याचा अभ्यास रोखण्यासाठी नव्हे, तर त्याला अधिक खोलवर समजून घेण्यासाठी झाले पाहिजे. फुले, आंबेडकर, पेरियार, सावित्रीबाई फुले, शर्मिला रेगे, गेल ऑम्व्हेट किंवा अन्य चिकित्सक विचारवंतांचे ग्रंथ विद्यार्थ्यांच्या हातातून काढून घेण्याऐवजी त्यांच्या समोर अधिक ग्रंथ, अधिक संदर्भ, अधिक प्रतिवाद आणि अधिक ज्ञान ठेवणे हीच विद्यापीठाची शैक्षणिक भूमिका ठरू शकते. कारण विचाराला उत्तर विचारानेच देता येते; भीतीने नाही!

(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी आणि फुले-शाहू-आंबेडकर व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)

**-भीमराव सरवदे, ९४०५४६६४४१**

# झाडीबोली लोककला, संस्कृती व साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी एकता समर्थ

## मुल येथे २८ व २९ नोव्हेंबरला रंगणार साहित्यिक-सांस्कृतिक सोहळा; निवडीबद्दल शहरात अभिनंदनाचा वर्षाव

निळे प्रतीक न्यूज नेटवर्क

**मुल । प्रतिनिधी**

झाडीबोली लोककला, संस्कृती आणि साहित्याच्या समृद्ध परंपरेचा जागर करणारे झाडीबोली लोककला, संस्कृती व साहित्य संमेलन यंदा मुल शहरात रंगणार आहे. २८ व २९ नोव्हेंबर २०२६ रोजी मा.सा. कन्नमवार सभागृह, मुल येथे आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी मुल नगर परिषदेच्या नगराध्यक्ष एकता प्रशांत समर्थ यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.मराठी भाषा विभाग तसेच महाराष्ट्र साहित्य आणि सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र शासनाच्या अनुदानित झाडीबोली साहित्य मंडळ, चंद्रपूर यांच्या वतीने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाच्या पार्श्वभूमीवर झाडीबोली साहित्य मंडळाच्या कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीत नगराध्यक्ष एकता समर्थ यांची स्वागताध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली.झाडीबोली ही विदर्भाच्या लोकजीवनाशी, बोलीभाषेशी, लोककला, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारशाशी घट्ट जोडलेली आहे. त्यामुळे मुल शहरात होणाऱ्या या संमेलनातून झाडीबोली साहित्याबरोबरच लोककला आणि संस्कृतीचे विविध पैलू रसिकांसमोर मांडले जाणार आहेत. साहित्यिक, कलावंत, लेखक, लोककलावंत आणि रसिकांच्या सहभागामुळे संमेलनाला विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे.स्वागताध्यक्षपदी एकताताई समर्थ यांची निवड झाल्याची माहिती समोर आल्यानंतर मुल शहरात त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. स्थानिक पातळीवर साहित्य आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी या संमेलनाच्या माध्यमातून मोठे व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यावेळी झाडीबोली साहित्य मंडळाचे अध्यक्ष अरुण झगडकर, सचिव लक्ष्मण खोब्रागडे, उपाध्यक्ष चंद्रकांत लेनगुरे, कोषाध्यक्ष संजीव बोरकर, सदस्य प्रशांत भंडारे, संतोष उईके, नागेंद्र नेवारे, संतोष मेश्राम, सुखदेव चौथाले, परमानंद जेंगठे, महिलाध्यक्ष रत्नमाला भोयर, केंद्रीय सदस्य बंडोपंत बोढेकर, विनायक धानोरकर, उपेंद्र रोहनकर, रामकृष्ण चनकापुरे आदी उपस्थित होते.



# २० वर्षांनंतर पुन्हा जमले यार! जांबुवंत विद्यालयाच्या २००५-०६ बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात

## जुन्या आठवणींना उजाळा; गावरान तुपाची धार, डाळ-बट्टीचा बेत आणि डीजेच्या तालावर मित्रांची धमाल

निळे प्रतीक न्यूज नेटवर्क
**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील रोहिलागड येथील जांबुवंत विद्यालयाच्या सन २००५-०६ मधील माजी विद्यार्थ्यांचा तब्बल २० वर्षांनंतर अविस्मरणीय स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. दोन दशकांनंतर बालपणीचे मित्र एकत्र आल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आणि स्नेह, आनंद व भावनेने वातावरण भारावून गेले.

शाळेतील वर्गातील बाकं, मित्रांसोबत केलेली मस्ती, शिक्षकांनी केलेली शिक्षा, वर्गमित्रांच्या खोड्या आणि शाळेतील असंख्य गमती-जमती या सगळ्या आठवणींना या स्नेहमेळाव्यात पुन्हा एकदा उजाळा मिळाला. अनेक वर्षांनंतर एकमेकांना भेटलेल्या मित्रांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि जुन्या आठवणी सांगताना उमटणारे हास्य हे मेळाव्याचे खास आकर्षण ठरले.विशेष म्हणजे, शाळेच्या काळात गंमतीने 'सगळ्यात ढ' म्हणून ओळखली जाणारी २००५-०६ ची ही बॅच आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहे. या बॅचमधील अनेक माजी विद्यार्थी शासकीय, निमशासकीय तसेच खासगी क्षेत्रात विविध महत्त्वाच्या पदांवर कार्यरत असून आपल्या क्षेत्रात योगदान देत आहेत. त्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा देतानाच मित्रांच्या आजच्या यशाचा अभिमानही या मेळाव्यात व्यक्त झाला.गावरान तुपाची धार, डाळ-बट्टीचा खास बेत, बालपणीचे मित्र आणि जुन्या आठवणींच्या गप्पा यामुळे स्नेहमेळाव्याला अस्सल ग्रामीण मातीचा सुगंध लाभला. मित्रांनी एकत्रितपणे भोजनाचा आस्वाद घेत जुन्या आठवणींना उजाळा दिला.यानंतर डीजेच्या तालावर सर्व मित्रांनी मनसोक्त नृत्य करत आनंद लुटला. वयाची दोन दशके पुढे सरकली असली तरी मैत्रीतील उत्साह, आपुलकी आणि बालपणीची धमाल आजही तशीच कायम असल्याचे या क्षणांतून दिसून आले.वीस वर्षांनंतर पुन्हा एकदा एकत्र आलेल्या या मित्रांनी जुन्या आठवणींना उजाळा देत स्नेहाचे बंध आणखी घट्ट केले. शाळेचे शिक्षण संपले, आयुष्याच्या वाटा वेगळ्या झाल्या; मात्र 'शाळा संपली, पण मैत्री संपली नाही' याची जिवंत अनुभूती देणारा हा स्नेहमेळावा प्रत्येकाच्या मनात कायमचा कोरला गेला.



# जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत शिव छत्रपती महाविद्यालयाला घवघवीत यश



निळे प्रतीक न्यूज नेटवर्क
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधन प्रवृत्ती निर्माण व्हावी,या उद्देशाने प्रेरित होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने प्रत्येक वर्षी आविष्कार स्पर्धेचे आयोजन केले जाते.त्यानुसार दि.२९ सप्टेंबर २०२६ रोजी मराठवाडा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरस महाविद्यालय बीड बायपास येथे संपन्न झाली.या स्पर्धेत शिवछत्रपती महाविद्यालयाला ६ पारितोषिके मिळाली.विजेत्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीमती डॉ.सी.एस.पाटील यांनी अभिनंदन करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, अजून या विषयावर तुम्ही मनलावून काम करा,मेहनत घ्या,थांबू नका हा सल्ला दिला.

यावेळी उपप्राचार्य डॉ.संगिता राजमाने,प्रा.भरत वहाटुळे, पर्यवेक्षक डॉ.गवळी ए.एम.प्रा.पाटील आर.व्ही. व विजेते विद्यार्थी व त्यांचे मार्गदर्शन प्राध्यापक व विभाग प्रमुख उपस्थित होते.या आविष्कार स्पर्धेसाठी समन्वयक म्हणून प्रा.डॉ.डोफे मॅडम,प्रा.डॉ.स्नहेल गरजे व प्रा.गाडे हनुमान रघुनाथ प्रा.धनश्री बोधडकर यांनी जबाबदारी सांभाळली.

# वेदांशू शेळके यांचे बाल रंगभूमी परिषद जल्लोष लोक कलेचा गायन स्पर्धेत यश




निळे प्रतीक न्यूज नेटवर्क
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

बालरंगभूमी परिषद मुंबई आयोजित छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील एम जी एम विद्यापीठ येथे झालेल्या जल्लोष लोककलेचा यात एकल गायन स्पर्धेत वेदांशू शेळके यांनी प्रथम क्रमांक मिळवला ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.तसेच या मुळे त्यांची लातूर येथे होणाऱ्या राज्य स्तरीय गायन स्पर्धे साठी निवड झाली आहे खूप खूप अभिनंदन

# शिल्पा पवार यांना एमबीए फायनान्स पदवी

निळे प्रतीक न्यूज नेटवर्क
**मंठा । प्रतिनिधी**

मंठा येथील शिल्पा संजय पवार यांनी व्यवसाय प्रशासनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील एम.जी.एम. आयोजित करण्यात आलेल्या पदवी प्रदान समारंभात त्यांना मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (एमबीए फायनान्स) ही पदवी प्रदान करण्यात आली.

विद्यापीठाच्या वतीने आयोजित या विशेष समारंभास विविध मान्यवरांची उपस्थिती होती. कमलकिशोर कदम, अंकुशराव कदम, प्रा. डॉ. विलास सपकाळ, डॉ. आशिष गाडेकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत शिल्पा पवार यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या शिफारशीनुसार त्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

शिल्पा पवार यांनी एमबीए फायनान्स अभ्यासक्रमाच्या परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत एकूण १० पैकी ९.०१ सीजीपीए मिळविले. त्यांच्या या यशामुळे मंठा शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात त्यांच्या कामगिरीची विशेष दखल घेतली जात आहे.



व्यवसाय प्रशासन आणि वित्तीय व्यवस्थापन या क्षेत्रात उच्च शिक्षण पूर्ण करून शिल्पा पवार यांनी आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी हे यश मिळविले. त्यांच्या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच मंठा शहरातील नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# अंतरीक्ष करिअर अकॅडमीच्या वतीने मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात संपन्न

निळे प्रतीक न्यूज नेटवर्क
**मंठा । प्रतिनिधी**



युवकांमध्ये क्रीडा व व्यायामाची आवड निर्माण व्हावी, तसेच शारीरिक तंदुरुस्तीबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने अंतरीक्ष करिअर अकॅडमी, मंठा यांच्या वतीने मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तळणी फाटा ते ठेंगे वडगाव या मार्गावर ही स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या मॅरेथॉन स्पर्धेचा शुभारंभ शिवसेना तालुकाप्रमुख तथा नगरसेवक उदयसिंह बोराडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मंठा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे, पोलीस कर्मचारी आनंद ढवळे, काकडे, राठोड सर, मदने यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.मॅरेथॉनमध्ये अंतरीक्ष करिअर अकॅडमीचे विद्यार्थी, शिक्षक तसेच युवक व क्रीडाप्रेमींनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. तळणी फाटा येथून सुरू झालेली ही स्पर्धा ठेंगे वडगाव येथे उत्साहात संपन्न झाली.

युवकांनी नियमित व्यायाम, धावणे आणि विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन निरोगी जीवनशैली अंगीकारावी, तसेच स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक क्षमता आणि आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने अकॅडमीच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.या उपक्रमासाठी अंतरीक्ष करिअर अकॅडमी, मंठाचे संचालक राजेश सुभाष शिंदे (पोलीस पाटील) यांनी पुढाकार घेतला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अकॅडमीचे शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे योगदान लाभले.मॅरेथॉनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, चिकाटी, शारीरिक तंदुरुस्ती आणि संघभावना यांचा संदेश देण्यात आला. या उपक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, भविष्यातही अशा क्रीडा व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

# सराईत घरफोडी करणारा आरोपी जेरबंद ; ४ लाख ३२ हजारांचा मुद्देमाल जप्त; घरफोडीच्या तीन गुन्ह्यांची उकल

निळे प्रतीक न्यूज नेटवर्क
**परभणी । प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जिल्ह्यातील चोरी व घरफोडी गुन्ह्यांची माहिती घेत असताना जालना जिल्ह्यातून एका आरोपीस ताब्यात घेतले असून हा आरोपी घरफोडी प्रकरणातील सराईत गुन्हेगार आहे. त्याने पालम आणि चुडावा येथे घरफोडी केलेल्या गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, सराईत घरफोडी प्रकरणातील आरोपी रमेश आण्णा शिंदे वय ३० वर्षे रा. मंगरूळ ता. घनसावंगी जि. जालना हा त्याचे घरी आला आहे. सदर माहिती वरिष्ठांना कळवून त्यांचे आदेशाने स्था.गु.शा. पथकाने मंगरूळ, जि. जालना येथे जाऊन त्यास ताब्यात घेतले. विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने त्याचे साथीदार १) संजय तुकाराम गायकवाड रा. भोकरदन २) अमोल सुरेश पवार रा. मंगरूळ जि. जालना यांचेसह पालम व चुडावा पोलीस ठाणे हद्दीत घरफोड्या केल्याची कबुली दिली.आरोपीकडून एकूण ३०.२० ग्रॅम सोन्याचे दागिने, किंमत बाजारभावाप्रमाणे ४ लाख ३२ हजार २०० रुपये जप्त करण्यात आले.



१) पो.स्टे. पालम गु.र.नं. १४५/२०२५ कलम ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.सं
२) पो.स्टे. पालम गु.र.नं. १४६/२०२५ कलम ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.सं.
३) पो.स्टे. चुडावा गु.र.नं. ९७/२०२५ कलम ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.सं. इत्यादी गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदर आरोपीची वैद्यकीय तपासणी करून त्यास मुद्देमालासह पुढील तपासकामी पोलीस ठाणे पालम येथे हजर करण्यात आले आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व अपर पोलीस अधीक्षक तान्हाजी चिखले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या नेतृत्वात चंदनसिंह परिहार, मधुकर चटटे, पोलीस अंमलदार सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, रंगनाथ दुधाटे, नेताजी गीते, गजानन क्षीरसागर, हनुमान ढगे, विलास बहुरे यांनी केली आहे.

# धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनापूर्वी पत्रकारिता विभाग ते विधी विभागाचा रस्ता दुरुस्त करा

## बौद्ध लेण्यांकडे जाणाऱ्या मार्गाची दुरवस्था, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे कुलगुरूंना निवेदन

निळे प्रतीक न्यूज नेटवर्क
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पत्रकारिता विभाग ते विधी विभागादरम्यानचा रस्ता अत्यंत खराब झाला असून, विद्यार्थ्यांसह प्राध्यापक व नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. येत्या २० ऑक्टोबर रोजी धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त बौद्ध लेण्यांकडे महाराष्ट्राच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने नागरिक येणार असल्याने, त्यापूर्वी या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलनाने केली आहे.



यासंदर्भात आंदोलनाच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यापीठाच्या कुलगुरूंना निवेदन सादर केले. पत्रकारिता विभाग ते विधी विभागापर्यंतचा रस्ता खराब झाल्यामुळे विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना दररोज ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. रस्त्यावरील खड्डे आणि खराब पृष्ठभागामुळे वाहनचालक तसेच पादचाऱ्यांना त्रास होत असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्यावरही परिणाम होत असल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे.

विद्यापीठ परिसरातील रस्ते दर्जेदार आणि सुरक्षित असणे आवश्यक आहे. मात्र, या मार्गाची दुरवस्था विद्यापीठाच्या प्रतिमेलाही बाधा आणत असल्याचे आंदोलनाचे म्हणणे आहे.

धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर बौद्ध लेण्यांकडे जाणाऱ्या या मार्गावर महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. त्यामुळे कार्यक्रमापूर्वी रस्त्याची दुरुस्ती न झाल्यास नागरिकांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसह नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने रस्त्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, विद्यापीठातील इतर रस्त्यांची कामे होत असताना बौद्ध लेण्यांकडे जाणाऱ्या या रस्त्याचे काम रखडल्याने समाजामध्ये विविध चर्चा होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशासनाने रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून या संदर्भातील गैरसमज दूर करावा, अशी मागणीही आंदोलनाने केली आहे. निवेदनावर सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अक्रम खान, तसेच अमरदिप हिवराळे आणि अविनाश सावंत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाची प्रत विद्यापीठाचे कुलसचिव तसेच स्थावर मालमत्ता विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आली आहे.

# स्वाधार योजनेच्या नूतनीकरण अर्जास १५ ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ

निळे प्रतीक न्यूज नेटवर्क
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी नूतनीकरण (Renewal) अर्ज करण्याची मुदत ३० सप्टेंबर २०२६ रोजी देण्यात होती. तथापि विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देणे गरजेचे असलेने नूतनीकरण अर्ज करण्यासाठी १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.त्यानुषंगाने स्वाधार योजनेसाठी अद्याप नूतनीकरणाचा अर्ज न केलेल्या विद्यार्थ्यांनी १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत आपला अर्ज ऑनलाइन पद्धतीने http://hmasnew.mahait.org/ या पोर्टल वर सादर करावा असे आवाहन विशाल लोंढे सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी केले आहे.

# दिवा रेल्वे स्थानकातील प्रवाशांच्या समस्यांबाबत रेल्वे प्रशासनाला निवेदन

निळे प्रतीक न्यूज नेटवर्क
**मुंबई । प्रतिनिधी**

दिवा रेल्वे स्थानकातील प्रवाशांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांकडे रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवराज्य ब्रिगेड सामाजिक संघटनेच्या वतीने उप-स्टेशन मास्तर श्री. एस. के. सिंग यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. प्रवाशांच्या दैनंदिन अडचणी दूर करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. संघटनेचे कोकण विभागीय अध्यक्ष सुजय सावंत यांच्या नेतृत्वाखाली, ठाणे महानगर उपाध्यक्ष विलास उतेकर यांच्या प्रयत्नातून हे निवेदन देण्यात आले. यावेळी ठाणे जिल्हा उपाध्यक्ष उमेश भानसे, ठाणे जिल्हा संघटक शशिकांत कुंभारगण आणि ठाणे महानगर संघटक अनिल पवार यांचे सहकार्य लाभले.